# अर्जित रजा (EL)व विशेष पूरक रजा (SPL)सविस्तर माहिती

उदा:- २०१० ते २०३८ एकूण २८ वर्षे कार्यकाळ (सर्विस)

| | अर्जित रजा (EL) | विशेष पुरक रजा (SPL) |
|---|---|---|
| ०१] पहिले वर्ष (जॉइनिंग):- | २४ दिवसाला १ | ३६ दिवसाला १ |
| पासून | याप्रमाणे = ०१५ | याप्रमाणे = ००७ |
| ०२] पुढील २७ वर्षे :- | १ वर्षात ३० | १ वर्षात १० |
| | २७ × 30 = ८१० | २७ × १० = २७० |
| | एकूण = ८२५ | एकूण = २७७ |

एकूण रजा ८२५ + २७७ = ११०२

०३] सेवानिवृत्ती नंतर ३०० दिवस शिल्लक असावे म्हणून (१० महिन्याचा पगार)

एकूण रजा ११०२ – ३०० = ८०२

०४] प्रत्येक दोन वर्षातून रजा रोखीकरण करता येते एकूण २८ वर्षाच्या कार्यकाळात १३ ते १४ वेळा रोखीकरण करता येऊ शकते. = १३ × ३० = ३९०

एकूण रजा ८०२ – ३९० = ४१२

०५] प्रत्येक चार वर्षातून एकदा रजा मुदत प्रवास योजनेअंतर्गत भारतातील इतर ठिकाणी जाता येते त्याकरिता लागणारी रजा ही अर्जित रजा (EL) किंवा विशेष पुरक रजा (SPL) टाकावी लागते एकूण ७ वेळा उपभोगता येईल अंदाजे

एकूण रजा ४१२ – ५६ = ३५६

७ × कमीत कमी ८ दिवस = ५६ वरील पैकी काहीजण मूळ गावी जातात.

वरील पैकी राहिलेले २५६ दिवस राजा ही कर्मचाऱ्याला आपल्या सेवा कार्यकाळात द्यावयाची आहे. म्हणजे पहिले १ वर्ष सोडून उरलेल्या २७ वर्षात प्रत्येक वर्षी १३ रजा घेतल्या जाऊ शकतात.त्यामुळे अर्जित रजा (EL) व विशेष पुरक रजा (SPL)वापरताना वरील तक्त्याचा अभ्यास करीत वापरल्यास आपणास अडचण येणार नाही.

## ★ ३०० दिवस रजा शिल्लक ठेवणे पद्धत :-

०१] सेवानिवृत्तीनंतर मिळणारी दहा महिन्यांची (३०० दिवस) रजा आहे. रोखीकरण स्वरूपात मिळते.

०२] कर्मचाऱ्या मधील दुसरा व चौथा शनिवार सुट्टी त्यांना भेटत नाही (टेक्निकल स्टाफ) अशा कर्मचाऱ्यांना अर्जित रजा अर्जित रजा (EL) व विशेष पुरक रजा (SPL) मिळून ३०० रजा शिल्लक ठेवता येतात.

उदा :- एखाद्या व्यक्तीची अर्जित रजा (EL) २७० दिवस शिल्लक आहे तर त्याच्या विशेष पुरक रजा (SPL) रजे-

मधुन ३० रजा घेऊन एकूण ३०० दिवस करता येतात.

०३] ज्या कर्मचाऱ्यांना दुसरा चौथा शनिवार सुट्टी मिळते (नॉन टेक्निकल स्टाफ) अशा कर्मचाऱ्यांना फक्त अर्जित (EL) रजेचे शिल्लक असलेल्या रजेचेच रोखीकरण मिळते. विशेष पुरक रजा (SPL) त्यामध्ये घेता येत नाहीत.
उदा :- एखाद्या व्यक्तीची २७० दिवस अर्जित रजा शिल्लक असल्यास त्याला फक्त २७०दिवसाच्या रजेचे रोखीकरण मिळते. विशेष पुरक रजा (SPL) रजा त्यात वाढवून मिळत नाही.

★ **रजा रोखिकरण (Incashment) :-**

०१] रजा रोखीकरण म्हणजे ३० दिवसाचा १ महिन्याचा पगार.

०२] रजा रोखीकरण २ वर्षातून एकदा करता येते यावेळी कर्मचाऱ्यांच्या खात्यावर अर्जित रजा (EL) व विशेष पुरक रजा (SPL) मिळून ६० रजा शिल्लक असणे अनिवार्य आहे. म्हणजे त्यातील ३० दिवसाचे रोखीकरण खालील ठरवून दिलेल्या स्लॅबमधील वर्षाप्रमाणे एका स्लॅबमध्ये एकदा याप्रमाणे घेता येते.

★ **रजा रोखिकरण स्लॅब तक्ता :-**

| अ.क्रं. | रोखिकरण स्लॅब | अ.क्रं. | रोखिकरण स्लॅब |
|---|---|---|---|
| ०१ | ०१/०४/२०१२ ते ३१/०२/२०१४. | ०८ | ०१/०४/२०२६ ते ३१/०२/२०२८. |
| ०२ | ०१/०४/२०१४ते ३१/०२/२०१६. | ०९ | ०१/०४/२०२८ ते ३१/०२/२०३०. |
| ०३ | ०१/०४/२०१६ ते ३१/०२/२०१८. | १० | ०१/०४/२०३० ते ३१/०२/२०३२. |
| ०४ | ०१/०४/२०१८ ते ३१/०२/२०२०. | ११ | ०१/०४/२०३२ ते ३१/०२/२०३४. |
| ०५ | ०१/०४/२०२० ते ३१/०२/२०२२. | १२ | ०१/०४/२०३४ ते ३१/०२/२०३६. |
| ०६ | ०१/०४/२०२२ ते ३१/०२/२०२४. | १३ | ०१/०४/२०३६ ते ३१/०२/२०३८. |
| ०७ | ०१/०४/२०२४ ते ३१/०२/२०२६. | १४ | ०१/०४/२०३८ ते ३१/०२/२०४०. |

०३] रजा रोखीकरण हे २ जानेवारीनंतर २ जुलैनंतर किंवा आपल्याला लागू होणाऱ्या इन्क्रिमेंट या महिन्यात शक्यतो करावे. कारण जानेवारी व जुलै या महिन्यात महागाई भत्ता वाढ होत असते. व वरील स्लॅब मधील तारखेच्या दरम्यान करण्यात यावे.

★ **रजा रोखिकरणात मिळणारे अलाउन्स :-**

०१] अर्ज केलेल्या महिन्यातील बेसिक :-

०२] अर्ज केलेल्या महिन्यातील महागाईभत्ता :-

०३] विशेष पूरक भत्ता (sp. comp allowance) :-

०४] जड काम भत्ता (Heavy Duty allowance) :-

०५] फ्रींच बेनिफिट (FB allowance) :-

★ **नविन कर्मचारी (NewJoining) :-** नविन कर्मचारी यांनी जॉइनिंग पासुन स्वतःच्या खात्यावर अर्जित रजा (EL) व विशेष पुरक रजा (SPL) दोन्ही रजा मिळून ६० रजा शिल्लक असताना रोखीकरण ३० दिवसाचे करता येते.

★ **रजा मुदती प्रवासाचे स्लॅब :-**

| अ.क्रं. | ४ वर्षाला १ याप्रमाणे स्लॅब (कालावधी) |
|---|---|
| ०१ | १ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१५ |
| ०२ | १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१९ |
| ०३ | १ जानेवारी २०२० ते ३१ डिसेंबर २०२३ |
| ०४ | १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२७ |
| ०५ | १ जानेवारी २०२८ ते ३१ डिसेंबर २०३१ |
| ०६ | १ जानेवारी २०३२ ते ३१ डिसेंबर २०३५ |
| ०७ | १ जानेवारी २०३६ ते ३१ डिसेंबर २०३९ |
| ०८ | १ जानेवारी २०४० ते ३१ डिसेंबर २०४३ |

रजा मुदत प्रवासात अर्जित रजा किंवा विशेष पूरक रजेचा वापर करावा लागतो. त्यामुळे वरील प्रमाणे आपण रजा घेतली असल्यास खालील तक्त्यात त्याची नोंद करावी व रजेचे नियोजन योग्य पद्धतीने करावे.

★ **अर्ध पगारी रजा (HAP) :-**

०१] कर्मचारी रुजू दिनांकापासून १ वर्षाला २० याप्रमाणे मिळणारी रजा.

०२] सेवानिवृत्ती पर्यंत ३६० अर्ध पगारी रजा खात्यावर शिल्लक असणे गरजेचे आहे. म्हणजे सेवानिवृत्ती नंतर १८० दिवस (६ महिन्याचा) पगार रोख स्वरूपात मिळतो.

०३] अर्ध पगारी रजा तिन दिवसाचा वर घेतल्यास मेडिकल सर्टिफिकेट सादर करावे लागते.

वरील दोन्ही रजा मिळून १६ महिन्याचा व रोखीकरण समजा १४ महिने असे एकूण ३० महिन्याचा पगार मिळण्यासाठी आपणाला रजा उपभोगताना जे नियोजन करायचे आहे ते खालील प्रमाणे करावे आपल्या रजा (LAP) वाया देखील होणार नाही.

★ **पंचवार्षिक पगारवाढ तक्ता :-**

| अ.क्रं. | ५ वर्षातून एकदा याप्रमाणे स्लॅब (कालावधी) |
|---|---|
| ०१ | १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २०१३ |
| ०२ | १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१८ |
| ०३ | १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०२३ |
| ०४ | १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२८ |
| ०५ | १ एप्रिल २०२८ ते ३१ मार्च २०३३ |
| ०६ | १ एप्रिल २०३३ ते ३१ मार्च २०३८ |
| ०७ | १ एप्रिल २०३८ ते ३१ मार्च २०४३ |
| ०८ | १ एप्रिल २०४३ ते ३१ मार्च २०४८ |

रजा रोखिकरण करतांना वरील पंचवार्षिक पगारवाढीच्या तारखा लक्ष्यात घेतल्यास त्याचा देखील रोखिकरण करण्यास फायदा होऊ शकतो.

### ★ कार्यकाळ प्रमाणे रजेचा तक्ता :-

| कार्यकाळ | अर्जित रजा १ वर्ष २३ दिवसाला १व नंतर३० प्रमाणे | विषेश पुरक रजा वर्षाला १० | (१+ २) एकूण | सेवानिवृत्ती नंतर रोखिकरण | रजा रोखिकरण २ वर्षातून १ दा | LTCसाठी ४ वर्षातून १ दा कमीतकमी८ | ४+५+६ एकूण | (३-७) शिल्लक व घ्याव-याच्या रजा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| २८ वर्ष | १५+८१० =८२५ | २८० | ११०५ | ३०० | १४ X ३० =४२० | ७ x ८ =५६ | ७७६ | ३२९ १२ रजा वर्षाला |
| ३० वर्ष | १५+८७० =८८५ | ३०० | ११८५ | ३०० | १५ X ३० =४५० | ७ x ८ =५६ | ८०६ | ३७९ १३ रजा वर्षाला |
| ३२ वर्ष | १५+९३० =९४५ | ३२० | १२६५ | ३०० | १६ X ३० =४८० | ८ x ८ =६४ | ८४४ | ४२१ १३ रजा वर्षाला |
| ३४ वर्ष | १५+९९० =१००५ | ३४० | १३४५ | ३०० | १४ X ३० =५१० | ८ x ८ =६४ | ८७४ | ४७१ १४ रजा वर्षाला |
| ३६ वर्ष | १५+१०५० =१०६५ | ३६० | १४२५ | ३०० | १८ X ३० =५४० | ९ x ८ =७२ | ९१२ | ५१३ १४ रजा वर्षाला |
| ३८ वर्ष | १५+१११० =११२५ | ३८० | १५०५ | ३०० | १९ X ३० =५७० | ९ x ८ =७२ | ९४२ | ५६३ १५ रजा वर्षाला |

वरील तक्त्याप्रमाणे आपल्या सेवेच्या कालावधीप्रमाणे यामध्ये कमी जास्त होऊ शकेल परंतु नियोजन करणे व रजेचा उपभोग घेणे.

धन्यवाद...

| अर्जित रजेचा तपशील एका आर्थिक वर्षात ३० प्रमाणे. | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सन | शिल्लक रजा | एकूण जमा रजा | उपभोगलेल्या रजेचा तपशील | | | | | शिल्लक रजा | इतर माहीती |
| | | | १ | २ | ३ | ४ | ५ | | |
| २०१०-११ | - | १५ (२४ दिवसाला १) | - | - | - | - | - | १५ | प्रथम वर्षाला २४ दिवसाला १ याप्रमाणे |
| २०११-१२ | १५ | १५+२९=४४ | - | - | - | - | - | ४४ | |
| २०१२-१३ | ४४ | ४४+३०=७४ | ८ सप्टें. २०१२ ते १० सप्टें. २०१२. ३ दिवस रजा | - | - | - | - | ७४-३=७४ | एकूण ३ दिवस रजा |
| २०१३-१४ | ७१ | ७१+३०=१०१ | १० ऑक्टो. २०१३ ते १५ नोव्हें. २०१३. ३० दिवस रजा रोखिकरण | - | - | - | - | १०१-३०=७१ | रजा रोखिकरण १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१४. |
| २०१४-१५ | ७१ | ७१+३०=१०१ | २ एप्रिल २०१४ ते ३ मे २०१४. ३० दिवस रजा रोखिकरण | ११ मे २०१४ ते २४ मे २०१४. १३ दिवस LTC | - | - | - | १०१-४३=५८ | रजा रोखिकरण १ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१६. LTC २०१२ ते २०१५. |
| २०१५-१६ | ५८ | ५८+३०=८८ | - | - | - | - | - | ८८ | - |
| २०१६-१७ | ८८ | ८८+३०=११८ | - | ०४ ऑक्टो. २०१६ ते ०५ नोव्हें. २०१६. ३० दिवस रजा रोखिकरण | - | - | - | ११८-३०=८८ | रजा रोखिकरण १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१८. |